भूमापन क्रमांकाच्या उपविभागाची मोजणी
करण्याच्या कार्यपध्दती बाबत.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे ४११००१
परिपत्रक क्र. भूमापन २/ई.ऑ.नं.१२८२३४३/२०२५
दिनांक : २८/०२/२०२५

---

वाचा: १. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मधील कलम १३६, कलम ८५ चे पोटकलम (१),(२),(३),(५), कलम ८६, ८७ व त्या खालील नियम व तरतुदी.

२. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक एन.अे.अे.१०८०/२३९९४/ल-२, दि.२२/५/१९८१.

३. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ / वि.नो.क्र.२११/२०१८,दिनांक २९/०९/२०१८.

४. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. भूमापन-२/प्र.क्र. १२/२०१९, दि.१८/११/२०१९.

५. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.भूमापन-२/प्र क्र २३०/२०२३, दि.२२/१२/२०२३.

---

राज्यात वाढत्या शहरीकरणामुळे खरेदी विक्रीच्या व्यवहारात झालेली वाढ, वारसा हक्काने तसेच अन्य कारणाने एकाच सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर चे धारकांचे संख्येत खूप मोठया प्रमाणात वाढ झालेली असून धारण जमिनीच्या खरेदी विक्री वेळी हद्दीची खात्री करुन घेण्यासाठी आणि नियोजन प्राधिकरणाकडे वस्तुस्थितीदर्शक नकाशा सादर करण्यासाठी जमीनधारक त्यांच्या जमिनीची मोजणीसाठी अर्ज करतात. परंतु वेळोवेळी जमिन धारकांनी पोटहिस्सा मोजणीसाठी अर्ज न केल्याने किंवा इतर सहधारकांनी संमती न दिल्याने धारकनिहाय नकाशे अद्ययावत झालेले नाहीत. धारकनिहाय उपविभागांची / पोटहिस्स्यांची मोजणी करण्याबाबत कायदा व नियमातील तरतूदी व परिपत्रकातील सुचना खालीलप्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ कलम ८७ अन्वये महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्याचे एकत्रिकरणाबाबत अधिनियम, १९४७ च्या उपबंधास अधीन राहून भूमापन क्रमांकाचे उपविभागात विभागणी करता येते. तसेच त्याखालील महाराष्ट्र जमीन महसुल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ या मध्ये भूमापन क्रमांकाची उपविभागात विभागणी मोजणी, त्यावरील आकारणी, त्यावरील होणाऱ्या खर्चाची वसुली इत्यादीबाबत सविस्तर पोटहिस्सा मोजणी बाबत नियम ठरविण्यात आले आहेत.

२. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./भूमापन-३/ वि. नो. क्र. २११/२०१८, दिनांक २९/०९/२०१८ अन्वये पोटहिस्सा मोजणीसाठी भूमापन क्रमांकातील किंवा उपविभागातील सर्व सहधारकांची **संमती नसल्यास** पोटहिस्सा मोजणीचा अर्ज स्विकारणे व त्यानुसार मोजणीची कार्यवाही करुन अभिलेख दुरुस्ती करणेच्या कार्यवाहीमध्ये एकवाक्यता राहावी यासाठी पोटहिस्सा मोजणीच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. भूमापन-२/प्र.क्र.१२/२०१९, दिनांक १८/११/२०१९ अन्वये भूमापन क्रमांकामध्ये किंवा त्याच्या उपविभागामध्ये विभागणी करणेसाठी त्या भूमापन क्रमांकातील किंवा उपविभागातील सर्व सहधारकांनी **संमतीसह** एकत्रित अर्ज केल्यास, विहीत पोट हिस्सा मोजणी फी भरुन घेवून पोटहिस्सा मोजणीची पुढील कार्यवाही नियमानुसार केली जाते.

एकाच सर्व्हे नंबर, हिस्सा नंबर / गट नंबर चे ७/१२ सदरी धारकांची संख्या जास्त असल्याने व त्यांचे नकाशे स्वतंत्र नसल्याने मोजणीचे वेळी हद्दी व क्षेत्राबाबत होत असलेले वाद कमी करण्यासाठी सध्याचे प्रचलित नियम, शासन निर्णय व

परिपत्रक यामधील तरतुदी विचारात घेवून भूमापन क्रमांकाचे उपविभागाची मोजणी करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे स्वयंस्पष्ट सूचना देणेत येत आहेत.

**भूमापन क्रमांकाच्या उपविभागाची मोजणी करण्याची कार्यपध्दती**

**१. मोजणी अर्जाबाबत :-**

१) एकाच सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर मध्ये एकापेक्षा अधिक सहधारक असल्यास कोणत्याही सहधारकास अगर हितसंबंधितास संपुर्ण सर्व्हेनंबर/ गटनंबर/ हिस्सा नंबर ची मोजणी करावयाची असल्यास, ई मोजणी आज्ञावली मध्ये हद्दकायम मोजणी प्रकारात आणि वैयक्तिक धारण क्षेत्राची मोजणी करावयाची असल्यास पोटहिस्सा मोजणी प्रकारात अर्ज करावा.

२) मोजणी करावयाचे क्षेत्रास महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे बाबत व त्याचे एकत्रिकरणाबाबत अधिनियम, १९४७ मधील प्रमाणभूत क्षेत्राबाबतच्या प्रचलित तरतुदी लागु राहतील.

३) ई-मोजणी आज्ञावलीमध्ये मोजणी अर्जासोबत पुर्ण सर्व्हे नंबर / गट नंबर/ हिश्श्यांचे सर्व सहधारक, लगतधारक व मोजणी करावयाच्या जागेचे चतु:सिमा धारक यांचे नावे, पत्ते व भ्रमणध्वनी क्रमांक ही माहिती भरावी.

४) ई-मोजणी आज्ञावलीमध्ये मोजणी अर्जासोबत खालील कागदपत्रे अपलोड करावी.

   १. मोजणी करावयाचे जागेचे नोंदणीकृत खरेदीखत किंवा हक्क संपादनाचा पुरावा.
   २. मोजणी करावयाच्या जागेचे के. एम. एल. फाईल किंवा चतु:सीमा, धारकांचे नावासह कच्चा मोजणी नकाशा अर्जदाराचे स्वाक्षरीसह पी.डी.एफ.(.pdf) व जे.पी.ई.जी. (.jpeg) इत्यादी
   ३. परिशिष्ट १ मध्ये नमूद केले प्रमाणे प्रतिज्ञापत्र.
   ४. महसुल व वन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक एन.अे.अे.१०८०/२३९९४/ल-२, दिनांक २२/५/१९८१ अन्वये महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रामध्ये नविन झालेल्या उपविभागाच्या मोजणीसाठी महानगरपालिका/ नगरपालिका किंवा नगर रचना विभाग यांचेकडील ना-हरकत प्रमाणपत्र.
   ५. मोजणी करावयाचे जागेचे प्रत्यक्ष जागेवरील वहीवाटीच्या पक्क्या खुणा जसे की बांध, तारेचे कुंपण, दगड, दगडाची भिंत, वहिवाटीचे क्षेत्र इत्यादी बाबीचे मोजणी अर्ज भरण्यापूर्वीचे १५ दिवसांचे कालावधीतील-तारीख व वेळ दर्शविणारे डिजिटल छायाचित्र / ईमेज.

**२. मोजणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर मोजणीपूर्वी करावयाची कार्यवाही :-**

१) सर्व संबंधीत लगत धारक, सहधारक यांना किमान १५ दिवस मुदतीच्या नोटीसा रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात आणि ई-चावडी आज्ञावलीवर प्रसिध्द कराव्यात. त्या अनुषंगाने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ मधील कलम २३० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

२) मोजणी करावयाच्या हिस्स्याचे / क्षेत्राचे चतु:सीमा धारक यांना नोटीस रुजु झाल्याबाबत पोस्टाची पोहोच व ट्रॅक रिपोर्ट प्रकरणी सामील करावा. कोणत्याही परिस्थितीत नोटीस बजावल्याखेरीज मोजणी करणेत येवू नये.

३) अर्जदार यांनी परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेप्रमाणे मोजणी करावयाचे जागेवर दर्शनी भागात जागेचा तपशील व मोजणी दिनांक याबाबतचा फलक मोजणी दिनांकापूर्वी किमान ७ दिवस अगोदर लावणे बंधनकारक राहील. सदर फलकाचे तारीख व वेळ दर्शविणारा डिजिटल फोटो अर्जदार यांनी मोजणी तारखेपूर्वी ७ दिवस अगोदर त्यांचे लॉगीनमधून ई मोजणी आज्ञावलीमध्ये अपलोड करावा. मोजणी कर्मचारी यांनी मोजणी करण्यापूर्वी सदरचा फोटो अपलोड केला असलेबाबत खात्री करावी.

**३. मोजणी वेळी करावयाची कार्यवाही :-**

१) या कार्यालयाकडील दि.२८/०२/२००७ रोजीचे सूचनांप्रमाणे मोजणी करावयाच्या जागेस प्रत्यक्ष जागेवरील बांध, तारेचे कुंपण, दगड, दगडाची भिंत, वहिवाटीचे क्षेत्राच्या हद्दीच्या खुणा इत्यादी असतील तरच मोजणी करणेत यावी.

२) अर्जदार व सर्व लगत धारक यांनी सर्वसंमतीने वहिवाटीचे क्षेत्र दाखवून समक्ष हद्दीच्या खुणा करुन घेतल्यास त्याप्रमाणे मोजणी करण्यात यावी.

३) मोजणी वेळी, अर्जदार व मोजणी करावयाच्या जमीनीचे/ हिस्स्याचे चतु:सीमा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर असणे बंधनकारक आवश्यक असेल. लगत धारक उपस्थित राहतील याची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहिल.

४) दि.०१/०१/२००० रोजीचे परिपत्रकातील सूचनांप्रमाणे मोजणीवेळी संबंधीतांचे हस्तलिखित दिनांकित स्वाक्षरीचे जाबजबाब व उपस्थितांचे पंचनामे नोंदवून अपलोड करावेत.

५) मोजणीवेळी नमूना नं. ४ गुणाकार बुकाचे सर्व रकाने भरुन त्यावर संबंधितांच्या स्वाक्ष-या घेवून ते अपलोड करावे.

६) मोजणी जी एन एस एस रोव्हर्स या आधुनिक यंत्राद्वारे करुन अक्षांश रेखाशांसह (co-ordinate) मोजणी नकाशा तयार करुन अपलोड करावा.

७) मोजणी करताना त्याच क्षेत्राची अथवा लगत क्षेत्राची अथवा सदर सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर मधील इतर क्षेत्राची यापुर्वी मोजणी झाली असल्यास मोजणी प्रकरणातील हद्दी संबंधीचा तपशील विचारात घ्यावा.

८) मोजणी करावयाच्या गटनंबर, सर्व्हेनंबर अथवा पोटविभागाचे मूळ अभिलेख व नकाशामध्ये रस्ता दर्शविलेला असेल तर किंवा महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३, मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ चे कलम ५ नुसार आदेश, सक्षम प्राधिकरण किंवा नियोजन प्राधिकरण किंवा सक्षम न्यायालय यांचेकडील आदेशाने स्वयंस्पष्ट मोजमापाचा परंतु सदर आदेशाप्रमाणे ७/१२ अधिकार अभिलेख सदरी नोंद असलेला रस्ता मोजणी नकाशावर दर्शविण्यात यावा.

९) मोजणी करणारे कर्मचारी यांनी मोजणीचे वेळी उपस्थित अर्जदार व उपस्थित हितसंबंधित यांचे समवेत दिनांक / वेळ व अक्षांश व रेखांश दर्शविणारा डिजिटल फोटो काढून (Time / Date stamping with Latitude & Longitude) पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे.

**४. मोजणीनंतर करावयाची कार्यवाही:-**

१) पोट हिस्सा मोजणी बाबत महाराष्ट्र जमीन महसुल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ मधील नियम क्रमांक १६ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

कलम १६ - सिमा निश्चित करणे.

१) कोणताही विवाद नसेल त्याबाबतीत, भूमापन अधिका-याने तशा अर्थाची नोंद केल्यानंतर तो, जमीन धारकाने निवेदन केले असेल त्यानुसार प्रत्येक उपविभागाची सीमा निश्चित करील.

२) कोणताही विवाद असेल त्याबाबतीत, तो ज्या उपविभागाच्या संबंधात असेल त्याची मोजणी करण्यात येईल व दोन्ही विवादकांच्या मागण्यांच्या अनुसार त्याचा नकाशा काढण्यात येईल व विवाद्य प्रकरणांच्या नोंदवहीमध्ये त्या विवादाची नोंद करण्यात येईल. अधिनियमाचे उपबंध किंवा तद्न्वये केलेले नियम या अन्वये विवाद मिटवल्यानंतर नकाशामध्ये त्यानुसार बदल करण्यात येईल व क्षेत्रांची भूमि-अभिलेखांमध्ये अंतिमरीत्या नोंद करण्यात येईल.

२) मोजणी नकाशामध्ये या कार्यालयाकडील दि.१६/११/१९९६ चे परिपत्रकाप्रमाणे " ------- (तुटक रेषा) याप्रमाणे अर्जदार व लगत कब्जेदार यांनी मोजणीचे वेळी दाखविलेली वहिवाट असे." असे स्पष्टपणे नमूद करावे.

३) मोजणी कर्मचारी यांनी अर्जदार यांचे मिळकतीची तसेच संबंधित संपूर्ण सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबरची प्रत्यक्ष मोजणी करुन संपूर्ण सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर नकाशात दर्शवावा.

४) मोजणी नकाशामध्ये संपूर्ण सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर मूळ अभिलेख नकाशाप्रमाणे कायम केलेल्या हद्दी ह्या काळ्या रंगाच्या भरीव रेषेने दर्शवून नवीन होणारा पोट हिस्सा लाल रंगाच्या भरीव रेषेने दर्शवावा व तशी टिप स्पष्टपणे नमूद करावी.

५) मोजणी नकाशामध्ये नवीन पोटहिस्स्यास या कार्यालयाकडील परिपत्रक, क्र. भूमापन-२/प्र क्र २३०/२०२३, दिनांक २२/१२/२०२३ मधील तरतुदीप्रमाणे नवीन हिस्सा क्रमांक देण्यात यावेत.

६) मोजणी नकाशा अंतिम करण्यापूर्वी उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी स्थानिक विकास प्राधिकरणाचे ठिकाणी व ई चावडी आज्ञावलीवर किमान १० दिवस नकाशा प्रसिध्द करावा. व स्थानिक नियोजन प्राधिकारी यांना पाठवावा.

७) मोजणीअंती क्षेत्र मेळ घेऊन प्रत्येक हिस्स्याचे क्षेत्र अधिकार अभिलेख ७/१२, मिळकत पत्रिकेवरील संबंधित धारकाचे क्षेत्रापेक्षा जास्त असल्यास प्रकरण विनाकार्यवाही निकाली करावे. कोणत्याही परिस्थितीत अधिकार अभिलेख ७/१२, मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राच्या नकाशाची प्रत पुरविणेत येवू नये.

८) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे बाबत व त्याचे एकत्रिकरणाबाबत अधिनियम, १९४७ मधील प्रमाणभूत क्षेत्राच्या तरतुदींचे पालन करावे.

**५. अभिलेख दूरूस्तीची कार्यवाही :-**

१) मोजणी नकाशा प्रसिध्द करून अंतिम केल्यानंतर तात्काळ हिस्सा फॉर्म नं. ४ व मोजणी नकाशाचे आधारे अभिलेख दुरुस्तीसाठी नमुना नं. ११ आकारफोड पत्रक, नमुना नं. १२ फाळणी बारा, फेअर स्केच इ. अभिलेख तयार करुन गावनकाशा व आकारबंदास दुरुस्ती करुन मोजणी नकाशा अर्जदार यांना पुरवावा.

२) अंतिम केलेल्या मोजणी नकाशा प्रमाणे फेअर स्केच नकाशा तयार करुन तो गाव दफ्तरी अभिलेखात सामिल करावा.

३) मोजणी नकाशा व हिस्सा फॉर्म नं. ४ प्रमाणे हिस्स्यांचे क्षेत्र अंतिम केल्यानंतर मुळ सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर यास नमूद असलेल्या आकाराची त्रैराशीक पध्दतीने विभागणी करून प्रत्येक हिस्स्यास आकारणी कायम करून नमुना नं. ११ आकारफोड पत्रक तयार करावे.

४) आकारफोड पत्रक तयार करताना मुळ सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर यास पोट खराब क्षेत्र नमूद असल्यास प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती व मूळ भूमापन अभिलेखातील नोंदी विचारात घेवून पोटखराब क्षेत्राची नोंद घेण्यात यावी.

५) त्यानंतर गावनकाशामध्ये नवीन पोट हिस्से बसविणेसाठी गट बुक नकाशा तयार करावा. त्याप्रमाणे कार्यालयातील गाव नकाशात दुरुस्ती करण्यात यावी.

६) आकारबंदामध्ये संबंधित सर्व्हे नंबर / गटनंबर ला नोंद घेवून आकारबंद अद्यावत करावा.

७) नमुना नं. ११ आकारफोड पत्रक तयार झालेनंतर त्याप्रमाणे नमुना नं. १२ फाळणी बारा तयार करून गट बुक नकाशासह संबंधित सक्षम प्राधिका-याकडे अधिकार अभिलेख दुरुस्तीसाठी पाठविण्यात यावा.

**६. हरकत प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही :-**

१) मोजणी समयी/ मोजणी झालेनंतर मोजणी प्रकरण निकाली होणेपूर्वी लगत कब्जेदार अथवा सहधारक यांची मोजणी बाबत हरकत / तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीमध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने नियमानुसार तपासणी करणे आवश्यक आहे.

२) सर्व सबंधितांना मोजणी नोटीस बजावणेत आली आहे किंवा कसे? याची पडताळणी करावी.

३) मोजणी करणारे कर्मचारी यांनी मोजणी करतेवेळी प्रत्यक्ष जागेवरील वहिवाटीच्या पक्या खुणा जसे की बांध, तारेचे कुंपण, दगड, दगडाची भिंत, वहिवाटीचे क्षेत्र इ. चा आधार घेतला आहे का? याची खात्री करावी. मोजणी समयी घेतलेले छायाचित्राची तपासणी करावी.

४) हरकतीचे अनुषंगाने प्राथमिक पडताळणी करून उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसुल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ चे नियम १६ मधील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./ भूमापन-३ / वि.नो.क्र.२११/२०१८,दि.२९/०९/२०१८ मधील सुचना विचारात घेवून कार्यवाही करावी.

**७. अपीले व फेर तपासणी व पुर्नविलोकनाबाबत :-**

उपविभाग मोजणीनंतर फाळणी बारा फेरफार आधारे ७/१२ अधिकार अभिलेखात फाळणी बाराचा रितसर अंमल करुन घेण्यात आलेल्या प्रकरणी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ मधील कलम २४७, कलम २५७ व कलम २५८ मधील तरतूदी लागू राहतील.

तसेच उपविभाग मोजणी कार्यवाही पूर्ण झालेली आहे तथापि, फाळणी बाराचा रितसर अंमल झाला नसल्यास अशा प्रकरणात वरिल परिच्छेद क्रमांक ६ (४) नुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख यांनी कार्यवाही करुन निर्णय देणेचा आहे.

वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसे न केल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारवाई केली जाईल.

या परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत करावी.

२८/२/२५

डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से.)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत :

१. मा. अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. सर्व विभागीय आयुक्त यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३. सर्व जिल्हाधिकारी तथा पदसिध्द उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४. सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
५. सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. सर्व उपअधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७. सर्व कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना माहितीस्तव.
८. परिपत्रक धारीका.

# परिशिष्ट १

## प्रतिज्ञापत्र

मी खालील सही / अंगठा करणार श्री / सौ. ------------------------------------------------------------------------------------ ------------ रा.--------------------- ता.------------------- जि.------------------ मी आपले कार्यालयास मौजे ------- ------------- ता. -------------- जि.-------------------- येथील गट नंबर / सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर / नगर भूमापन क्रमांक ---------------- मधील माझे धारण क्षेत्राची उपविभागाची मोजणी करून देणेसाठी रितसर मोजणी अर्ज दाखल करत असून भूमापन क्रमांकाचे उपविभागाची मोजणी संबंधी खालील अटी / शर्ती मला मान्य आहेत.

(१) वरील मिळकतीचे माझ्या क्षेत्राचे जागेवर तार कुंपण, दगड, दगडी भिंत, बांध असून त्याचे तारीख व वेळ दर्शविणारे डिजिटल छायाचित्र / ईमेज अर्जासोबत अपलोड केले आहे.

(२) मोजणी करावयाच्या जमिनीचे पुर्ण सर्व्हे नंबर / गट नंबर/ हिश्श्यांचे सर्व सहधारक, लगतधारक व मोजणी करावयाच्या जागेचे चतु:सिमा धारक यांचे नावे, पत्ते व भ्रमणध्वनी क्रमांक बरोबर असून त्यामध्ये चूक आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची असेल याची मला जाणीव आहे.

(३) मोजणी अर्जासोबत मोजणी करावयाच्या जागेचे के. एम. एल. फाईल किंवा चतु:सीमा, धारकांचे नावासह कच्चा मोजणी नकाशा अर्जदाराचे स्वाक्षरीसह पी.डी.एफ.(.pdf) व जे.पी.ई.जी. (.jpeg) इत्यादी फॅारमॅट मध्ये अपलोड केलेला असून तो बरोबर आहे.

(४) मोजणी वेळी सहधारक, लगतधारक यांनी हरकत घेतलेस प्रकरणी नियमानुसार होणारी कार्यवाही मला मान्य आहे.

(५) सदर मिळकतीबाबत आमचा कुणाशीही वाद नसून तसेच पोलीस स्टेशनला तक्रार नसून कोणत्याही न्यायालयात दावा दाखल अथवा प्रलंबित नाही. तसे असल्यास आपले कार्यालयाकडून नियमानुसार होणारी कार्यवाही मला मान्य आहे.

(६) सदर मिळकतीच्या मोजणीनंतर गटनंबर, सर्व्हेनंबर, हिस्सानंबर चे मुळ अभिलेखाशी (टिपण / फाळणी ) पडताळणी केल्यानंतर ७/१२ क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र असल्यास माझे मोजणी प्रकरण विनाकार्यवाही निकाली करण्यास माझी हरकत राहणार नाही म्हणून हे प्रतिज्ञापत्र लिहून दिले.

स्थळ :-

आपला

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठा)

अर्जदाराचे संपुर्ण नाव

# परिशिष्ट २

मोजणी दिनांकापुर्वी किमान ७ दिवस अगोदर मोजणी करावयाचे जागेचा तपशिल

व मोजणी दिनांक प्रसिध्द केलेबाबत फलकाचा फोटो

मोजणी करावयाच्या जागेचा तपशील

१. सर्व्हेनंबर / गटनंबर ------------- एकुण क्षेत्र ------

२. मोजणी अर्जदाराचे नाव ---------------------

३. वरील सर्व्हेनंबर / गटनंबर पैकी अर्जदार यांचे क्षेत्र --------

४. मोजणी दिनांक --------------

५. मोजणी करावयाच्या जागेच्या लगत कब्जेदार यांनी मोजणीवेळी उपस्थित राहणेचे आहे.

टिप : या फलकाचा तारीख व वेळ दर्शविणारा फोटो मोजणीपूर्वी २ दिवस अगोदर आज्ञावलीमध्ये अपलोड करावा.